PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Panch Najuk Bote
Year: 1972

Song: Sutaat Firtos
Lyricist: Jagdish Khebudkar

सुटात फिरतोस
हे मम्हईचा दिसतोस
अरे सुटात फिरतोस मम्हईचा दिसतोस
आल्या वाटंनं जाशील का
खेडवळ पोरी अगं दिसतीस न्यारी
खेडवळ पोरी दिसतीस न्यारी
अन् माझ्यासंगं मम्हईला येशील का
माझ्या संगं मुंबईला येशील का
गं माझ्या संगं बॉम्बेला येशील का

मम्हईत काय तुझं गाठुडं पुरलंय
कानात तू माझ्या सांगशील का
मम्हईत काय तुझं गाठुडं पुरलंय
कानात माझ्या सांगशील का
आरं कानात माझ्या सांगशील का
माझ्या सायबा
मऊ मऊ वाळूत जोडीनं
भेळपुरी खाऊ की गोडीनं
मऊ मऊ वाळूत जोडीनं
भेळपुरी खाऊ की गोडीनं
हातात हात चांदणी रात
हातात हात चांदणी रात
सागर शोभा बघशील का
अन् माझ्यासंगं मम्हईला येशील का
माझ्या संगं मुंबईला येशील का
गं माझ्या संगं बॉम्बेला येशील का
आरं येईन येईन येईन
पर सांगू काय करीन
सांग सांग सांग

जात्यावर ओवी गाईन मी

कांदाभाकरी खाईन मी
जात्यावर ओवी गाईन मी
कांदा नि भाकरी खाईन मी
शाळूचा हुरडा ऊनऊन
मिरच्याचा खर्डा लाल लाल
शाळूचा हुरडा मिरच्याचा खर्डा
खायाला भरपेट देशील का
आ...
नाहीतर माघारी जाशील का
आरं नाहीतर माघारी जाशील का
आगं माझ्यासंगं मम्हईला येशील का

ठावं हाय मम्हई
फुकटचा तोरा घामाच्या धारा
अन् पंख्याचा वारा
ठावं हाय मम्हई
फुकटचा तोरा घामाच्या धारा
अन् पंख्याचा वारा
घामाच्या धारा अन् पंख्याचा वारा
जाजाजा आरं जाजाजा
माझ्या सायबा

सायबाचा शिनिमा दावीन मी
नाचायला कॅब्रे लावीन मी
सायबाचा शिनिमा दावीन मी
नाचायला कॅब्रे लावीन मी
इंपाला गाडी छेडा छेडी

इंपाला गाडी छेडा छेडी
खांद्यावर मान तू टाकशील का...
मंग आता

माझ्यासंगं मम्हईला येशील का
माझ्या संगं मुंबईला येशील का
गं माझ्यासंगं बॉम्बेला येशील का
पुरे तुझी मम्हई खेडयात चल
खेडयात चल अन् काय कर
जिमनीचा वाफा फुलवावा तिथं
नांगर फाळा चालवावा
जिमनीचा वाफा फुलवावा तिथं
नांगर फाळा चालवावा
हिरव्या रानी गारगार
वाजंल पानी झुळझुळ
हिरव्या रानी पाजून पानी
मोटची लावणी गाशील का

आ...

माझ्या ढवळयाला वढ हा
माझ्या पवळयाला वढ हा
त्यो काय येतोय चला गं चला चला
तुझ्यासाठी मी मुंबई सोडली
आता खेडयाशी सोयरीक जोडली
तुझ्यासाठी मी मुंबई सोडली
आता खेडयाशी सोयरीक जोडली
सुखाची संगत अगं मायेची रंगत
सुखाची संगत मायेची रंगत
ओ...
हिरवी दुनिया दावशील का
हिरवी दुनिया दावशील का
राजाची रानी तू होशील का
या राजाची रानी तू होशील का

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*